**ठळक बातम्या**

- इराण बरोबरच्या युद्धबंदीला इस्त्रायलची सहमती जाहीर
- ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून २ हजार २९५ भारतीय नागरिक मायदेशी सुखरुप परतले
- लष्करासाठी तातडीच्या खरेदी यंत्रणेअंतर्गत १ हजार ९८१ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावाला संरक्षण मंत्रालयाची मंजुरी
- विविध देशांबरोबरच्या व्यापार करारांमुळे भारतीय निर्यातीचा चेहरामोहरा बदलून जाईल, असा केंद्रीय अर्थमंत्र्यांना विश्वास
- अंदाज समित्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**आणि**

- भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं निधन

**<><><><><>**

इराण बरोबरच्या युद्धबंदीला अखेर इस्त्रायलने सहमती दिली आहे. इराणने कतारमध्ये असलेल्या अमेरिकेच्या तळावर क्षेपणास्त्र हल्ले केल्यानंतर काही तासांतच अमेरिकेने ही घोषणा केली. मात्र आतापर्यंत इस्त्रायलने त्याबाबत अधिकृत घोषणा केली नव्हती. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमामुळे निर्माण झालेल्या धोक्याला आळा घालण्याचं उद्दिष्ट साध्य झालं असून भविष्यात या युद्धबंदीच्या कराराचं उल्लंघन झाल्यास इस्त्रायल ते सहन करणार नाही, असं इस्त्रायल सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू लवकरच युद्धबंदीबाबत आपलं अधिकृत निवेदन जारी करतील, असंही या निवेदनात म्हटलं आहे.

गेले १२ दिवस सुरू असलेल्या या युद्धामुळे इराणमध्ये २२ जूनपर्यंत ८६५ जण मृत्युमुखी पडले आहेत. त्यात २१५ लष्करी कर्मचारी, ३६३ नागरिक आणि २८७ अज्ञात व्यक्तींचा समावेश आहे. तर ३ हजार ३००हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती मानवाधिकार वृत्तसंस्थेने दिली आहे. इस्त्रायलमध्ये २४ नागरिकांचा मृत्यू झाला असून ६०० हून अधिक जखमी झाले आहेत.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं ऑपरेशन सिंधू अंतर्गत आत्तापर्यंत इराणमधून २ हजार २९५ भारतीय नागरिकांना मायदेशी सुखरुप परत आणलं आहे, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी दिली. इस्त्रायलमधूनही भारतीय हवाई दलाच्या सी सेव्हनटीन या विमानानं १६५ भारतीय नागरिक मायदेशी परतले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी त्यांचं नवी दिल्ली विमानतळावर स्वागत केलं. या मोहीमेअंतर्गत भारताच्या विमानांतून प्रवास करण्यासाठी श्रीलंकेच्या इस्त्रायलमधल्या १७ नागरिकांनीही नोंदणी केली असल्याची माहिती मंत्रालयानं दिली.

<><><><><>

संरक्षण मंत्रालयानं लष्करासाठीच्या  तातडीच्या खरेदी यंत्रणेअंतर्गत तेरा करारांना अंतिम स्वरूप दिलं असून, एकूण एक हजार ९८१ कोटी रुपयांची खरेदी केली जाणार आहे. याअंतर्गत एकात्मिक ड्रोन वेधक प्रणाली, हलक्या वजनाचे रडार, कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालीसाठीचे प्रक्षेपक  आणि क्षेपणास्त्रे, बुलेट प्रूफ जॅकेट्स आणि रायफल्ससाठी रात्रीच्या दृष्यमानतेच्या उपकरणांची खरेदी केली जाणार आहे.

दहशतवादाविरोधात सैनिकांना परिस्थितीची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, वेगवान हालचाली आणि घातकता वाढावी तसंच संरक्षणात वृद्धी व्हावी, या उद्देशानं ही खरेदी केली जाणार असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांची बैठक यंदा चीनच्या अध्यक्षतेखाली किंगडो इथं होत आहे. या दोन दिवसांच्या बैठकीला उद्या सुरुवात होईल. या बैठकीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वात भारताचं उच्चस्तरीय शिष्टमंडळ सहभागी होईल.

**<><><><><>**

उत्पादनाला आणि निर्यातीला चालना देण्यासाठी शुल्क कपात करण्याचं धोरण केंद्र सरकारने राबवल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं एक्जिम बँक व्यापार परिषद २०२५ या कार्यक्रमाला त्या आज संबोधित करत होत्या. देशाची एकूण निर्यात ८२५ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचली असून मागच्या वर्षीपेक्षा यात सहा टक्क्याची वाढ झाली आहे, असं अर्थमंत्री म्हणाल्या. विविध देशांशी भारताच्या व्यापार करारांमुळे निर्यातीचा चेहरामोहरा बदलून जाईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

शंभर वर्षांपूर्वी श्री नारायण गुरू आणि महात्मा गांधी यांची झालेली भेट ही आजही सामाजिक समरसतेसाठी, विकसित भारताच्या उद्देशासाठी उर्जेचा एक स्रोत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज नवी दिल्ली इथे भारतातले दोन महान आध्यात्मिक नेते श्री नारायण गुरु आणि महात्मा गांधी यांच्यातल्या ऐतिहासिक संवादाच्या शताब्दी समारंभात बोलत होते. या भेटीने भारतीय स्वातंत्र्य लढ्याला दिशा तर दाखवलीच, पण स्वातंत्र्य मिळवण्याच्या उद्देशाला आणि स्वतंत्र भारताच्या स्वप्नाला एक आयामही दिला.

**होल्ड बाईट- प्रधानमंत्री**

**<><><><><>**

केंद्र आणि राज्य सरकारकडून कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च वाढत असल्याने संसद आणि विधिमंडळाच्या अंदाज समित्यांची जबाबदारी वाढली असून या समित्यांनी अधिक कार्यक्षमतेने जबाबदारीचं पालन करावं असं आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात केलं. अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. देशावरील कर्जाचा भार पाहता जन कल्याणासाठी अधिक खबरदारीने खर्च करण्याची गरज आहे. त्यात या समित्यांची भूमिका महत्वाची असल्याचे ते म्हणाले.

संसदीय समित्या सरकारच्या विरोधी नव्हे तर पूरक काम करतात. त्यांच्या अहवालाकडे पाहताना सरकारने हाच दृष्टिकोन ठेवावा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या समित्यांचे अहवाल योग्यरितीने अंमलात आणावे अशी सूचना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी केली.

**Hold - Byte**

संसदीय समित्यांनी योग्य रीतीने समीक्षा केली तर अनेक बदल घडू शकतील. आतापर्यंत अनेक बदल झाले असले तरी बदलांना खूप वाव आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आणि तंत्रज्ञान तसंच data analysis चा वापर करून अधिक चांगलं काम करता येईल, असही ओम बिर्ला म्हणाले.

सुशासनासाठी विचारपूर्वक खर्चाची गरज असते यावर परिषदेत चर्चा झाल्याचं राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. संसदेच्या अंदाज समितीचे अध्यक्ष संजय जयस्वाल यांनी या परिषदेत झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला. विधान

परिषद सभापती राम शिंदे, विधान सभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा समावेश असलेल्या एक्सिओम चार या अवकाश मोहिमेची उद्या सुरुवात होणार असल्याची माहिती अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था नासाच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आली आहे. फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरवरून उद्या दुपारी बारा वाजून एक मिनिटांनी या अंतराळयानाचं प्रक्षेपण होणार आहे. गेल्या २९ मे ला सुरू होणार असलेली ही मोहीम तांत्रिक अडचणींमुळे पाच ते सहा वेळा पुढे ढकलण्यात आली होती.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन - तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेटमध्ये भारतानं इंग्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दुसऱ्या डावात भारताने ३६४ धावा केल्या असून उपकर्णधार ऋषभ पंतने ११६ धावा फटकावल्या. दोन्ही डावात शतक ठोकणारा तो पहिला फलंदाज ठरला आहे. के एल राहुलनेदेखील १३७ धावा केल्या. तर शेवटचे तीन फलंदाज शून्यावर बाद झाले. काल दिवसअखेर इंग्लंडने बिन बाद २१ धावा केल्या आहेत. सामन्याचा आज अखेरचा दिवस आहे.

**<><><><><>**

संविधान हत्या दिवस उद्या पाळण्यात येणार आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना त्यानिमित्त आदरांजली वाहण्यात येईल. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहते, तसंच हुकुमशाही

प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो.

**<><><><><>**

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं सोमवारी रात्री लंडन इथे हृदयविकारामुळे निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आठशे अठ्ठयाण्णव बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी २३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ वेळा ५ बळी घेतले. एका सामन्यात दहा बळी घेण्याचा विक्रम त्यांना सहा वेळा केला होता. भारतासाठी खेळण्याव्यतिरिक्त, दोशी यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये तसंच परदेशी कौंटी क्रिकेटमध्येही आपलं कौशल्य दाखवलं होतं. भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं दोशी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

सेवा सुशासन आणि गरीब कल्याण या तीन तत्वांवर आधारित राज्यकारभारच विकसित भारताचं उद्दिष्ट गाठू शकेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. १३व्या पारपत्र दिनानिमित्त त्यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे की पारपत्र सेवा कार्यक्रमाची दुसरी आवृत्ती देशभरात लागू झाली असून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर त्यात केला आहे.

**//<><><><><>//**